जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०७/२०२३
## दि.१५/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४७२/२०२३,भादविक ३०७,५०४,३२३,महाराष्ट्र पोलीस अधि.कलम ३७(१)(३)१३५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३५ वर्षे,रा.संतोषनगर कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०७/२०२३ रोजी १७/३० ते १८/०० वा. गंगनगिरी शाळे जवळ,संतोषनगर,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया तीचे मुलीसह घरात हजर असतांना,फिर्यादी यांचे नातेवाईक नमुद इसमाने फिर्यादीचे घरात येवुन,जुन्या भांडणाच्या कारणांवरुन व त्याचे लग्नास विरोध केल्याचा राग मनात धरून,फिर्यादी व तीचे मुलीला शिवीगाळ करून,त्याचे हातातील कु-हाडीने जीवे ठार मारण्याच्या उददेशाने,तीचे डोक्यात व हातावर पायांवर व पाठीवर कु-हाडीने मारुन गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरिक्षक, वर्षा तावडे ९२८४८७१३६० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २४७/२०२३,भादविक ३२६,३२३,५०४,३४,क्रिमीनल लॉ अॅमेनट अॅक्ट कलम ०७ |
| **फिर्यादी** | गणेश परदेशी,वय-२९ वर्षे,रा.नाना पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अभिषेक संजय शेलार,वय-२२ वर्षे,रा.भेकराईनगर,हडपसर,पुणे (अटक) तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०७/२०२३ रोजी १८/०० वा.साठे कॉलनी उद्याना लगत रोडवरती शुक्रवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची मोपेड गाडी ही नमुद ठिकपणी पार्क केलेली काढुन घेत असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना गाडी लवकर काढुन घे असे म्हणुन आरडा-आरडा करून,तुला माहीत नाही का,मी कोण आहे,मी इथला भाई आहे असे म्हणुन फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना शिवीगाळ करून,लोखंडी फायटरने नाकावर जोरात मारुन,लाथा-बुक्यांनी मारहाण करून त्यांना दुखापत केली. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, लक्ष्मण सोनवणे ९९२३६४०३०३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १३९/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | राजेश चव्हाण,वय-४८ वर्षे,रा.विघ्नहरनगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपीत** | एकुण चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०७/२०२३ रोजी १५/४५ वा.ढवळे यांचे घरा समोर सार्वजनिक रोडवर,विघ्नहरनगर,बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने आपसात संगनमत करून,पुर्वीचे भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादी यांचे घरी येवुन त्यांचा मुलगा विधान राजेश चव्हाण,वय-२१ यास बोलावुन घेवुन,नमुद ठिकाणी शिवीगाळ करुन, हाताने व लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,तुला जिवंत ठेवणार नाही,खल्लासच करतो असे जोर-जोरात ओरडून फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,विधान चव्हाण यास मोठ्या दगडाने त्याचे चेह-यावर व डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. (फिर्यादी यांची मानसिक स्थिती ठिक नसल्यामुळे त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, राजकुमार बरडे ९०२८३१२३५३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५७४/२०२३,भादविक ३०६,४९८(अ),३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-३९ वर्षे,रा.दबडगांवकर कॉलनी,माजलगांव,जि.बीड |
| **आरोपीत** | मयताचे पती व त्याचे इतर ०७ नातेवाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | पाठीमागील १५ ते १६ वर्षापासुन दि.१२/०७/२०२३ रोजी १०/३० वा.पर्यंत मोतीलाल धुत कंपनीचे रुममध्ये भावडी ४ नंबर,ता.हवेली,जि.पुणे व मुळगांव आनंदवाडी,ता.परतुर,जि.जालना येथे मयताचे सासरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण सौ.गिता रमेश जाधव,वय-३४ वर्षे,धंदा-गृहीणी व मजुरी,रा.मोतीलाल धुत कंपनीचे रुममध्ये भावडी ४ नंबर,ता.हवेली,जि.पुणे व मुळगांव आनंदवाडी,ता.परतुर,जि.जालना हिचे लग्न तीचा पती यातील नमुद इसम याचेबरोबर २० वर्षापुर्वी होवुन,ती पती व तीचे दोन मुलांसह सासरी नांदत असताना,तीचे पती व इतर नातेवाईक यांनी आपसात संगनमत करून, सौ.गिता हिस माहेराहुन नवीन मोटर सायकल खरेदी करण्यासाठी १,००,०००/- रुपये व प्लॉट खरेदीसाठी ५,००,०००/- रुपयेची मागणी करून,त्याकारणावरून तीस टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,सौ.गिता हिस तीचे राहते घरी दिनांक १२/०७/२०२३ रोजी १०/३० वा.नायलॉन दोरीने पत्र्याचे आडाला गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.वाय.राजगुरू ८८८८६१८४०० |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १७१/२०२३,भादविक ३५३,५०६ |
| **फिर्यादी** | एक अधिकारी,वय-२६ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०७/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा.पौड फाटा,सावरकर पुलाचे शेजारी मेट्रो पिलर क्र.९५ जवळ कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक या पदावर असुन,फिर्यादी हे त्यांचे सहकारी यांचेसह पौड फाटा सावरकर पुलाचे शेजारी मेट्रो पिलर क्र.९५ येथे लाकडी बांबुंचे ताडपत्रीचे शेडचे अतिक्रमण झाल्याने लाकडी बांबुंचे ताडपत्रीचे शेड काढुन,त्यांचेवर कारवाई करीत असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादीस अपशब्द वापरुन त्यांचेशी वाद करुन,पोलीस अंमलदार,खंदारे हे त्याला समजावुन सांगत, त्यांचेशी वाद घालुन,त्यांना ढकुलन धक्का-बुक्की करून,फिर्यादी व त्यांचे सहकारी हे त्यांचे सरकारी काम करीत असताना त्यांचे सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, कोंडे ९५४५८९५८९२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**